

# "समाज प्रगती सहयोग निधी"

## सहकार्याचे जाहीर आवाहन

### शृंखला पायी असू दे,
### मी गतीचे गीत गाई,
### दुःख उधळायास आता
### आसवांना वेळ नाही...

ह्या काव्यपंक्ती ज्यांनी रचल्या व प्रत्यक्षात तसे जगून दाखविले ते **बाबा आमटे** आणि त्यांच्या खऱ्या अर्थाने सहधर्मचारिणी – **साधनाताई आमटे,** या उभयतांनी महारोगी सेवा समितीच्या रुपाने सुरु केलेल्या कार्ययज्ञास २१ जून २०११ रोजी **६२ वर्षे** पूर्ण झाली. १४ रुपये, ६ कुष्ठरुग्ण, एक लंगडी गाय आणि दुर्दम्य इच्छाशक्ती या मुद्दलावर सुरु झालेल्या या कार्याने गेल्या सहा दशकांच्या वाटचालीत **२३ लक्ष** उपेक्षित बांधवांच्या जीवनास एक नवा आयाम देऊ केला आहे. करुणेपासून आत्मसन्मानापर्यंतचा लक्ष लक्ष बांधवांचा हा प्रदीर्घ प्रवास म्हणजे "येथे सेवेचे रामायण लिहिल्या जाईल" ह्या आचार्य विनोबा भावेंच्या आशीर्वचनाची फलश्रुतीच होय.

१९४९ साली एका पडीक जमीनीवर कुष्ठरुग्णांचे उपचार–प्रशिक्षण–पुनर्वसन या उद्देशाने सुरु झालेल्या कार्याचे विस्तारीकरण नंतर अंध, अपंग, मूक–बधिर यांच्या शिक्षण–प्रशिक्षण, पुनर्वसन या क्षेत्रांत झाले. इतकेच नव्हे, तर अनाथ, ज्येष्ठ नागरिक, आदिवासी अशा समाजातील गरजू, पण दुर्लक्षित समाजघटकांकरिताही अनेक प्रकारची उपयुक्त कामे उभी राहिली. हे साध्य झाले ते प्रामुख्याने संस्थेच्या सर्वसमावेशक उदिष्टांमुळेच. शारीरिक अपंगत्व असलेल्या बांधवांस जर एका शिस्तबद्ध, रचनात्मक विचारसूत्रात गुंफले तर त्यांच्या संघटित क्षमता अनेकपटीने वाढतात, या बाबा आमटेंच्या विश्वासाचे प्रतीक म्हणजे महारोगी सेवा समितीचा मुख्य प्रकल्प – **आनंदवन**. येथील स्वयंशिस्तीची गुरुकिल्ली नोकरशाहीविरहित आणि विकेंद्रित अशा कार्यसंस्कृतीत आहे. या स्वावलंबी समाजव्यवस्थेमुळे आनंदवन हा आज शाश्वत ग्रामीण विकास व सहजीवन यांचा एक जिताजागता आदर्श बनलेला आहे.

आनंदवनच नव्हे तर महारोगी सेवा समितीचे सोमनाथ, हेमलकसा व इतर अनेक छोटे–छोटे प्रकल्पही सामाजिक आणि रचनात्मक कार्यात नवनवे मानदंड प्रस्थापित करीत आहेत. या विचारांनी प्रेरित होऊन आज हजारो कार्यकर्ते विधायक कार्ये, चळवळी, आंदोलने अशा विविध स्वरुपांत देशाच्या कानाकोपऱ्यात दुर्बल घटकांच्या उत्थापनासाठी अविरत झटत आहेत.

या बासष्ट वर्षांच्या कारकिर्दीत संस्था वेगवेगळ्या प्रकारच्या अडचणींवर समर्थपणे उपाय शोधत कुष्ठरुग्णांच्या सशक्तीकरणासाठी अव्याहतपणे झटत आहे. परंतु समाजात कुष्ठरोगाबद्दल असणारे गैरसमज आजही अस्तित्वात असल्याचे प्रकर्षाने आढळून येते. सरकारी आकडेवारीनुसार जरी प्रयोगशाळांतील काचपट्ट्यांवरचे कुष्ठरोगाचे जंतू नाहीसे होत असले तरी समाजमनाच्या प्रतलावरील कुष्ठरुग्णांबद्दलची भिती अजूनही बऱ्याच प्रमाणात कायम आहे, हे कटू सत्य आहे. दुर्दैवाने या समाजघटकाच्या पुनर्उभारणीसाठी वितरीत होणारे शासकीय अनुदानही अत्यंत अपुरे आहे, ही खेदजनक बाब आहे. शासकीय अनुदानातील एकच आकडेवारी पाहिली तरी त्यामधील कमतरता ठळकपणे लक्षात येते. संस्थेतील **१२००** पुनर्वसित कुष्ठरुग्णांकरिता प्रति रुग्ण प्रति दिवशी मिळणारे अनुदान फक्त **रु. १५/–** आहे. या अनुदानात दोन वेळचे अन्न, चहा, औषधी, या व्यतिरिक्त वस्त्र, निवारा, प्रवास खर्च आणि घरांची डागडुजी एवढे संस्थेने करणे अपेक्षित आहे! आजच्या महागाईच्या काळात एवढ्या अनुदानात एक वेळचे जेवणसुद्धा पूर्ण होऊ शकत नाही हे सर्वदूर सत्य आहे. कुष्ठरुग्णांना किती अपुरे अनुदान मिळते हे यावरुन स्पष्ट दिसते. याव्यतिरिक्त संस्थेतील पुनर्वसित इतर कुष्ठरुग्ण व शारीरिक अपंगत्व असलेल्या एकंदर **९६४** व्यक्तींना कुठलेच शासकीय अनुदान वा इतर योजनांचा लाभ मिळत नाही.

आजवर हा खर्चाचा मोठा डोलारा सांभाळणे हे सामाजिक सद्‌भावना व आनंदवनाच्या उत्पादनानुगामी अर्थव्यवस्थेमुळे बऱ्याच प्रमाणात शक्य होत गेले. परंतु आसऱ्याला येणाऱ्यांचा वाढता ओघ, गगनास भिडलेली महागाई, अनुदानातील अनियमितता, निसर्गाचे कोप (उदा. अपुरा पाऊस, दुष्काळ) या आणि अशा अनेक बाबी नेहमीच संस्थेची परीक्षा बघणाऱ्या ठरतात. चार माणसांचे कुटूंब सांभाळतांना आज आपल्या समोर असंख्य अडचणी येतात. यावरुन संस्थेचा हा **२५००** पेक्षा अधिक निवासी व्यक्तींचा संसार सांभाळायचा म्हणजे किती प्रश्न उद्भवत असतील याची कल्पना आपणास येऊ शकते.





संस्थेत अजूनही दर दिवसाआड नव्या व जुन्या कुष्ठरुग्णांचा तसेच अपंग बांधवांचा ओघ चालूच आहे. "कोणत्याही आश्रयार्थी व्याधिग्रस्ताला कधीही नाही म्हणायचे नाही" हे व्रत संस्थेने मातृभावनेने अखंड राबविले आहे. या सततच्या वाढत्या जबाबदारीमुळे समाज प्रगतीच्या अनेक नव्या योजना तयार असूनही त्या कृतीत आणणे बऱ्याचदा शक्य होत नाही. तरीही गेल्या सहा दशकांच्या वाटचालीत प्रचंड अडचणींचा सामना करीत बाबा आमटेंच्या कार्याचा हा महारथ पुढेपुढेच वाटचाल करतो आहे. या कालखंडात संस्थेच्या उपक्रमांचा लाभ घेऊन समाजात स्वबळावर उभे राहिलेले लाखो दुर्लक्षित बांधव हे संस्थेच्या लोकसशक्तीकरण कार्याचे प्रतीक आहेत.

आजच्या घडीला देशाला रचनात्मक कार्यरुपी दीपस्तंभांची अधिक गरज आहे कारण समाजपरिवर्तनाला आधारभूत ठरणाऱ्या संस्था किती चैतन्यपूर्ण, कार्यक्षम आणि प्रयोगशील आहेत त्यावर त्या त्या देशांतील बदलांचे भवितव्य अवलंबून असते. वाढती महागाई, भ्रष्टाचार या भांडवलवादी अर्थव्यवस्थेच्या दुष्परिणामांच्या झंझावातात समाज परिवर्तनास आधारभूत संस्था पाचोळ्या सारख्या उडून जावू नयेत यासाठी समाजाने मोठ्या प्रमाणावर प्रयत्न करणे जरुरीचे आहे.

आज महारोगी सेवा समितीच्या कार्यास शाश्वत स्वरुपाचे आर्थिक स्थैर्य लाभावे याकरिता सामूहिक प्रयत्नातून **५५ कोटी** रुपयांचा एक निधी उभारण्यासाठी आम्ही प्रयत्नशील आहोत. या **"समाज प्रगती सहयोग निधी"** च्या व्याजातून संस्थेचे भविष्यातील आत्मनिर्भरतेचे स्वप्न तर पूर्ण होईलच, याशिवाय केवळ आर्थिक तूटीमुळे न पेलू शकणारी समाजातील अनेकविध नवी आव्हाने स्विकारण्यास संस्थेला बळ मिळेल. उदा. संस्थेत दरवर्षी आयोजित मोफत मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिराद्वारे केल्या जाणाऱ्या सुमारे १,५०० शस्त्रक्रियांची संख्या ९,००० पर्यंत वाढविता येईल, प्रतिवर्षी अल्पभूधारक शेतकरी कुटूंबांच्या जमीनींवर सुरु असणारे जल व मृद संधारणाचे कार्य १०० शेतकरी कुटूंबांपुरते मर्यादित न ठेवता १,२०० शेतकरी कुटूंबांपर्यंत विस्तारल्या जाऊ शकेल, दरवर्षी युवाग्राम प्रकल्पामार्फत १०० बेरोजगार तरुणांना दिल्या जाणाऱ्या व्यवसाय प्रशिक्षणाचा लाभ पाचपटीने अधिक देता येईल, सुमारे १,००० युवक-युवतींसाठी स्थानिक पातळीवर राबविल्या जाणाऱ्या वार्षिक श्रमसंस्कार छावणीस राज्यव्यापी छावण्यांचे स्वरुप देता येईल, इत्यादी...

आजवरची संस्थेची वाटचाल जनता–जनार्दनाच्या आशीर्वादांच्या सक्रीय पाठिंब्यामुळेच शक्य झाली आहे. सामान्य माणसास बाबा आमटेंच्या कार्याबद्दल वाटणारा अतीव जिव्हाळा आणि विश्वास हेच संस्थेच्या उज्ज्वल कारकिर्दीचे आधारस्तंभ आहेत. श्रीकृष्णाने गोवर्धन पर्वत उचलला तो गोकुळातील हजारो बांधवांच्या सहकार्याने; त्याचप्रमाणे, ह्या मुरलीधराचे नाव धारण करणाऱ्या बाबा आमटेंच्या संस्थारुपी गोवर्धनाचा भार उचलण्यासाठी जनता–जनार्दनाचे हजारो हात कामी लागले तर समाज प्रगती सहयोग निधीच्या उभारणीचे हे कार्य मुळीच अशक्य नाही. आज महाराष्ट्रातील **५५,०००** बांधवांनी प्रत्येकी **१०,०००** रुपयांची मदत जरी पाठविली तरी एका रात्रीत हा निधी सहजरित्या उभारणे शक्य आहे, असा आमचा दृढ विश्वास आहे. या निधीस दिलेल्या योगदानाला आयकर खात्याकडून कलम **३५ AC** अंतर्गत **१००% सूट** देण्यात आली आहे ही एक अतिशय अभिमानास्पद बाब आहे.

प्रभूचे हजारो अदृश्य हातच सामान्यांतल्या असामान्य जिद्दीद्वारे असे कार्य घडवून आणू शकतात याचा जो प्रत्यय बाबा आमटेंना वेळोवेळी आला होता, त्याच विश्वासाच्या भरवशावर जनता–जनार्दनास आम्ही “समाज प्रगती सहयोग निधी” च्या उभारणीत भरीव योगदान देण्याचे जाहीर आवाहन करीत आहोत.

आनंदवन परिवारात आपले सहर्ष स्वागत...

(डॉ. विकास आमटे)
सचिव व वैद्यकीय अधिक्षक

९९२२५५०००६

**पांगळ्यांच्या सोबतीला,**
**येऊ द्या बलदंड बाहू,**
**निर्मितीच्या मुक्त गंगा,**
**द्या इथे मातीत वाहू...**

आपल्या मदतीचे धनादेश “महारोगी सेवा समिती, वरोरा” या नावाने, आपले संपूर्ण नाव, पत्ता, e-mail id व PAN (Permanent Account Number) सह कृपया खालील पत्त्यावर पाठवावेत.

***सचिव, महारोगी सेवा समिती, वरोरा***
***मु. पो. आनंदवन, ता. वरोरा,जि.चंद्रपूर,***
***महाराष्ट्र राज्य, पिन : ४४२९१४***
(०७१७६) २८२०३४,
९०११०९४६२३
(कुरिअरने पाठवायचे असल्यास **फक्त** “**DTDC**” सोबत “वरोरा : **४४२९०७**” असा ठळक उल्लेख करून पाठवावे)

Email Address:vikasamte@anandwan.in

Website URL : http://www.anandwan.in

Facebook URL:
https://www.facebook.com/groups/243031789052334/?id=243325125689667&notif_t=group_activity

धनादेशाचे विवरण आपले संपूर्ण नाव, पत्ता व PAN सहीत वरील e-mail id/मोबाईल क्रमांकावर कळवावे, ही नम्र विनंती.

**Online Contribution Details:**

**SB A/C Name** : Maharogi Sewa Samiti, Warora
**SB A/C No.** 20255728439
**Name of Bank**: Bank of Maharashtra
**Branch** : Anandwan
**IFSC** : MAHB 0000792

या निधीची पावती धनादेश मिळाल्यापासून एक महिन्याच्या आत आपणास मिळेल. या निधीचा सदुपयोग कसा करण्यात येईल याबद्दल आनंदवन परिवार आपणांस वेळोवेळी विविध माध्यमांतून कळवेलच.